**रे.के. नं. ६७ /२०२०**

**नि. क्र. ४२**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ यांचा जबाब शथपेवर सुरु.</u>**

**नाव** – सिताराम धोंडु कोटकर,

**वय**– ६८ वर्षे, **नोकरी**– शेती,

**सध्या राहणार** – मोर्डे, गवळीवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीम. ए. व्ही. गुरुपातगोळ यांच्याकडून</u> –**

०१. माझा चुलत भाऊ आरोपी रविंद्र राजाराम कोटकर हा नेहमीच दारु प्यायलेला असतो. तो दारु पिऊन वाडीतील सर्वांनाच शिवीगाळ करत असतो आणि दादागीरी करत असतो आणि आम्हालाही शिवीगाळ करत असतो. मी दि. १९/०८/२०२० रोजी सायंकाळी ०८.०० मी शेजा–यांच्या घरी वाडीत गेलो होतो.

०२. त्यावेळी घरी आवाज झाला. शेजारचे लोक तीथे जमा झाले म्हणून मी ही गेलो. मी पाहीले की, माझी पुतणी संजनाच्या हाताच्या बोटाला कोयती लागली होती. माझी भाऊजय अनिता कोटकर हीच्या खांद्याला लागले होते आणि त्यातून रक्त येत होते. त्या दोघींनाही कोयती लागली होती. अंगणात मी कोयती पाहीली होती. मी ती कोयती पाहीली. माझ्या पुतणीला आणि भाऊजयीला लागलेले पाहीले त्यावरुन आरोपीने ती कोयती त्या दोघींना मारल्याचे मी सांगत आहे.

०३. मला ती कोयती आज न्यायालयात दाखवल्यास मी ओळखु शकतो. साक्षीदाराला आता लोखंडी कोयती हा मुद्देमाल दाखवण्यात आला. ही तीच कोयती आहे. मी गेलो त्यावेळी आरोपी शिवीगाळ करत होता. माझी भाऊजय आणि पुतणीला दुखापत झाल्याने आम्ही बाजूच्या रिक्षावाल्याच्या रिक्षातुन पोलीस पाटलांकडे गेलो.

त्यानंतर मुर्शी दुरक्षेत्रात गेलो. त्यानंतर त्या दोघींना साखरपा प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवण्यात आले. त्या दोघींनाही जास्त लागल्याने पुढील उपचारासाठी सामान्य रुग्णालय, रत्नागिरीला पाठवण्यात आले. पोलीसांनी या घटनेविषयी माझ्याकडे चोकशी केली होती. त्यावेळी मी पोलीसांना सर्व माहीती सांगीतली होती. आरोपीला पाहील्यास मी ओळखु शकतो. आज रोजी तो न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेकडुन –**

०४. हे म्हणणे खरे आहे की, दुस–या दिवशी मी स्वतःहुन पोलीस स्टेशनल मी कधी गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, दुस–या दिवशी पोलीसांनी माझ्याकडे व्यक्तीशः चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दुस–या दिवशी पोलीसांनी माझ्या समक्ष कोणतेही लिखाण केले नाही.

०५. हे म्हणणे खरे आहे की, वाडीतील जमलेल्या लोकांशी माझे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटना घडण्यापुर्वी माझे आरोपीशी संबंध चांगले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे मोर्डे गवळीवाडीतील घर मोडलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घराकडे जाण्यासाठी कोटकर कुटुंबियांची जागा लागते.

०६. हे मला माहीती नाही की, आरोपीच्या भावाने भावकीतील लोकांकडे मागणी केली होती की, त्यांचे घर बांधण्याकामी लागणारे साहीत्य नेण्याकरता सदरची जागा वापरायला द्यावी. हे म्हणणे खरे नाही की, कोटकर भावकी आणि आमच्या कुटुंबियांचे संयुक्तीक असे म्हणणे आहे की, आरोपीला घर बांधण्यासाठी ही जागा द्यायची नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याने घर बांधल्यानंतर तो वाडीमध्ये रहायला येईल असे आम्हाला वाटत असल्याने आम्ळी त्याला जागा वापरायला देत नाही. हे

म्हणणे खरे नाही की, आरोपी वाडीमध्ये रहायला येऊ नये अशी भावकीची आणि आमच्या कुटुंबाची इच्छा आहे. हे म्हणणे खरे नाही की, याच कारणास्तव आरोपी विरुध्द ही केस दाखल करण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर मी खोटा सांगितला आहे व आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.11.19 17:28:34 +0530

**(श्रीमती श्रुती ह. पाटील)**

**दिनांक १९/११/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**